ePaper

# 'सरसकट' प्रमाणपत्रे द्या; वंशावळीबाबतच्या शब्दाला आंदोलकांचा आक्षेप



| वर्ष - 7 । अंक - 126 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- भारत-पाक सामना धोक्यात?
- ठरलं तर मग 'जुईचं' लग्न
- इंडिया-भारत वादावर बोलू नका!
- जरांगे पाटील फकीर माणूस!


www.mahaenews.com | शुक्रवार , दिनांक 8 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews







पिंपरी : पिंपरी-चिंचवड आणि परिसरात कृष्ण जन्माष्ठमी आणि दहीहंडी उत्सव दिमाखात साजरा झाला. ठिकठिकाणी आकर्षक देखावे आणि जन्मोत्सव सोहळ्यात अबालवृद्धांनी सहभाग घेतला.

# बेकायदा वृक्षतोडीवर आता 'फौजदारी'

## »महापालिका प्रशासन आक्रमक : दंडात्मक कारवाईचा इशारा

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने वारंवार सूचना देऊनही शहरातील विविध ठिकाणी बेकायदेशीररित्या वृक्षतोड केली जात आहे. या प्रकाराला आळा घालण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या वतीने स्वतंत्र पथके नेमण्यात येणार असून या पथकांद्वारे शहरातील विविध ठिकाणांची पाहणी करून बेकायदेशीररित्या वृक्षतोड करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती उद्यान विभागाचे उप आयुक्त रविकिरण घोडके यांनी दिली आहे.**



> शहरात विनापरवाना वृक्षतोडीच्या घटना वारंवार घडत आहेत. शहराच्या विविध भागात जाहिरात फलकांसाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड होत आहे असे महापालिकेच्या उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाच्या निदर्शनास आले आहे. खाजगी तसेच महापालिकेची अखत्यारित असलेली झाडे विनापरवाना तोडली जात असून या वृक्षतोडीवर आळा घालण्यासाठी महापालिकेने कठोर पाऊले उचलण्यास सुरूवात केली आहे.
>
> **- रविकिरण घोडके, उप आयुक्त.**

पी. सी. एम. टी चौक भोसरी, देहू आळंदी रोड, गवळी माथा येथील घनकचरा हस्तांरण प्रकल्पाच्या मागील बाजूस तसेच एमआयडीसी भोसरी येथील कटफास्ट कंपनी एफ-२ ब्लॉक वंडरकार शोरूम जवळ, जाधववाडी चिखली येथील साईराज पब्लिसीटी फॅशन दुकानासमोर, आकुर्डी येथील तुळजा भवानी मंदिरासमोर आणि डुडुळगाव रांजनगाव पार्क या ठिकाणी जाहिरात फलक लावण्यासाठी बेकायदेशीररित्या वृक्षतोड करण्यात आली होती.

ही बाब महापालिकेच्या निदर्शनास येताच उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाच्या वतीने संबंधित जाहिरात फलक मालकांवर महाराष्ट्र झाडे तोडणे अधिनियम १९६४, कलम ३(१), महाराष्ट्र झाडे तोडणे अधिनियम १९६४, कलम ४, महाराष्ट्र झाडे तोडणे अधिनियम १९७५, कलम २१(१) अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली.

# उड्डाणपुलाचे काम रखडले!

## » कंपनी दिवाळखोरीत निघाल्याने फेरनिविदा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या रस्त्यावरील उड्डाणपुलाचे काम वेगाने सुरू झाले असतानाच सिंहगड रस्त्याला पर्यायी ठरणाऱ्या सनसिटी-कर्वेनगर नदीवरील उड्डाणपुलाचे काम रखडले असल्याचे स्पष्ट झाले आहे. सनसिटी-कर्वेनगर पुलासाठी भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महापालिका प्रशासनाकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.**




मात्र, काम दिलेली कंपनी दिवाळखोरीत निघाल्याने फेरनिविदा काढण्यात आली असून, निविदेला मंजुरी मिळाल्यानंतरही पुलाचे काम सुरू झाले नसल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडीही कायम राहिली आहे. कोथरूड, कर्वेनगर आणि सिंहगड रस्ता दरम्यानच्या राजाराम पुलावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून सिंहगड रस्ता सनसिटी येथून कर्वेनगरपर्यंत पूल प्रस्तावित आहे. महापालिकेच्या अंदाजपत्रकातही यासाठी तरतूद करण्यात आली आहे. उड्डाणपुलामुळे सिंहगड रस्ता आणि कर्वेनगर ही दोन उपनगरे काही मिनिटांत एकमेकांशी जोडली जाणार आहेत. या उड्डाणपुलासाठी महापालिकेने ३७ कोटींच्या खर्चाचा आराखडा केला असून, त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली होती. सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल ते फनटाइम चित्रपटगृह या दरम्यान उड्डाणपुलाचे भूमिपूजन झाल्यानंतर सनसिटी-कर्वेनगर पुलासाठी आवश्यक भूसंपादनाची रखडलेली प्रक्रिया महापालिका प्रशानसाकडून सुरू करण्यात आली होती. खासगी जागामालकांनीही त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला होता. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महापालिकेने कामाची निविदा प्रक्रिया राबविली होती. त्याला स्थायी समितीच्या ३ मे रोजीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली होती. मात्र, त्यानंतर काम मिळालेली कंपनी दिवाळखोरीत गेल्याचे स्पष्ट झाल्याने महापालिका प्रशासनाकडून फेरनिविदा राबविण्यात आली. त्यानुसार विजय पटेल यांच्या कंपनीला उड्डाणपुलाचे काम देण्यात आले आहे. मात्र अद्यापही काम सुरू झालेले नसल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीचा भार कायम राहिला असून, उड्डाणपुलाचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे. प्रस्तावित पुलामुळे सिंहगड रोड, कोथरूड आणि कर्वेनगरमधील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. काही दिवसांपूर्वी कोथरूडचे आमदार, मंत्री चंद्रकांत पाटील यांनी उड्डाणपुलाच्या कामासंदर्भात महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांची भेट घेतली होती. उड्डाणपुलाच्या कामाला गती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली होती.

### 30 मीटर रुंदीचा उड्डाणपूल

» जोडरस्त्यासह ३५० मीटर लांबीचा आणि ३० मीटर रुंदीचा हा उड्डाणपूल असून, त्याचे काम चोवीस महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. सिंहगड रस्ता, कोथरूड आणि कर्वेनगर या दरम्यानच्या राजाराम पुलावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हा उड्डाणपूल उपयुक्त ठरणार आहे. उड्डाणपूल उतरण्याच्या ठिकाणची जागा खासगी असल्याने भूसंपादन रखडले होते. मात्र, खासगी जागामालकांनी जागा देण्याची तयारी दर्शविली होती. त्यानसुार सध्या ९५ टक्के जागा महापालिकेच्या ताब्यात आली आहे. उर्वरित जागेचे भूसंपादन करण्यासाठी साडेसात कोटींची तरतूद महापालिकेने केली आहे. या खर्चालाही महापालिकेने मान्यता दिली आहे.

# पहिल्या बीआरटी मार्गाचे अस्तित्व संपुष्टात?

## »सोलापूर रस्ता रुंदीकरणासाठी पालिकाच हातोडा घालणार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सोलापूर रस्त्यावरील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी मार्गातील अडथळे हटविण्यात येणार असून, त्यामध्ये अनावश्यक ठरणारा बीआरटी मार्गही काढण्यात येणार आहे. तसेच पदपथांची रुंदी कमी करण्यात येणार असून, काही ठिकाणचे सायकल मार्गही काढले जाणार आहेत. त्यामुळे सोलापूर रस्त्यावरील बीआरटी मार्ग काढण्याची परंपरा कायम राहिली असून, बीआरटी मार्गाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

पुणे-सोलापूर रस्त्यावर वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. पंधरा वर्षांपूर्वी सोलापूर रस्त्यावर प्रायोगिक तत्त्वावर बीआरटी मार्ग करण्यात आला. कात्रज ते हडपसर या मार्गासाठी महापालिकेने १०० कोटी रुपयांचा खर्च केला. मात्र, बीआरटी मार्गामुळेच वाहतूककोंडीत भर पडत असल्याने या बीआरटी मार्गाला सर्वपक्षीय विरोध सुरू झाला आणि बीआरटी मार्गाचे अस्तित्व संपुष्टात येण्यास सुरुवात झाली. त्यात आता रस्ता वाहतुकीसाठी प्रशस्त करण्याच्या निमित्ताने महापालिका प्रशासनाकडूनही बीआरटी मार्गाचा काही भाग काढण्यात येणार आहे. भैरोबा नाला चौक ते आकाशवाणी या दरम्यानचा रस्ता पहिल्या टप्प्यात प्रशस्त केला जाणार आहे. त्यामुळे रस्त्यातील अतिक्रमणे दूर करण्यासंदर्भात महापालिका, पीएमपी, प्रादेशिक परिवहन विभाग आणि वाहतूक पोलीस यांच्यात गेल्या आठवड्यात बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये वाहतूककोंडी दूर करण्यासंदर्भात आणि रस्त्यावरील सर्व प्रकारचे अडथळे दूर करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. त्यानुसार ही कार्यवाही महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे.



> अडथळे हटविल्यानंतर सोलापूर रस्त्यावर चार मार्गिका उपलब्ध होणार आहेत. सध्या केवळ दोन मार्गिका आहेत. सेवा रस्ते आणि पदपथांवर अतिक्रमण होत असल्याने ती काढून रस्ता मोकळा करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. सर्व विभागांच्या सहमतीनंतरच या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल.
>
> **– व्ही. जी. कुलकर्णी,** मुख्य अभियंता, पथ विभाग

रस्ते प्रशस्त करण्यासंदर्भातील अडथळे दूर केल्यानंतर चार मार्गिका उपलब्ध होणार आहेत, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे. या अंतरातील अनावश्यक ठरणारा बीआरटी मार्ग काढला जाणार आहे. तसेच पदपथांची आणि सेवा रस्त्यांची रुंदीही कमी केली जाणार आहे. पदपथालगतचे सायकल मार्गही हटविण्यात येणार आहेत. बीआरटी थांबेही रस्त्याच्या कडेला बसविले जाणार आहेत. भैरोबा नाला चौक ते आकाशवाणी हा रस्ता सध्या ४५ मीटर रुंदीचा आहे. मात्र, त्यामध्ये दहा मीटर रुंदीचा बीआरटी मार्ग असून, दोन्ही बाजूला प्रत्येकी चार मीटर रुंदीचे पदपथ आणि सायकल मार्ग आहेत. काही ठिकाणी साडेसात मीटर रुंदीचे सेवा रस्ते ठेवण्यात आले आहेत. या अडथळ्यांमुळे आणि दुभाजक, तसेच अन्य अतिक्रमणामुळे सुमारे २४ मीटर रुंदीच्या रस्त्याचा वापर होत नाही. काही ठिकाणी सलग बीआरटी मार्ग नाही. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

## अधिकाऱ्यांनो... ‘पिंपरी-चिंचवडकरांची अस्मिता’ दुखावणार, तर

# तुम्हाला जागा दाखवणार!

## शासकीय अधिकाऱ्यांना स्थानिक लोकप्रतिनिधींचा गर्भीत इशारा : वादग्रस्त अधिकारी स्मिता झगडे यांची सातारा जिल्ह्यात बदली

। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

**महाराष्ट्रातील एकमेव शहर पिंपरी-चिंचवड म्हणता येईल की ज्या ठिकाणी प्रशासकीय कारभारात ‘पिंपरी-चिंचवडकरांची अस्मिता’ याचा प्रचंड प्रभाव आहे. याची पुन्हा एकदा प्रचिती आली. वादग्रस्त अधिकारी स्मिता झगडे यांची बदली सातारा जिल्ह्यात झाली असून, स्थानिक सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी मनमानी करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना याद्वारे गर्भीत इशारा दिला आहे, अशी चर्चा महापालिका प्रशासकीय वर्तुळात सुरू झाली आहे.**






राज्यातील महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात महापालिकेतील तत्कालीन सत्ताधारी भाजपाचा बंदोबस्त करण्यासाठी महापालिका कर संकलन विभागाच्या तत्कालीन प्रमुख स्मिता झगडे यांना “प्रशासकीय ताकद” देण्यात आली. त्याद्वारे आमदार महेश लांडगे आणि समर्थकांना ‘सरेंडर’ करण्याची रणनिती आखण्यात आली. त्यासाठी लांडगे यांची निकटवर्ती मानल्या जाणाऱ्या गुरूजी या ठेकेदार संस्थेला ‘टार्गेट’ करण्यात आले. गुरूजीवर कारवाई करण्यात आली. त्याची पाळेमुळे आमदार लांडगे यांच्यापर्यंत पोहोचतात का याची ‘ट्रायल’ घेण्यात आली. त्यासाठी तत्कालीन महापालिका आयुक्त आणि पदाधिकाऱ्यांनाही दबावात ठेवण्यात आले. या प्रकरणात खटलाही दाखल केला. परंतु, या प्रकरणात लांडगेंविरोधात काहीही हाताला लागले नाही.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहराच्या पायाभरणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान असलेल्या टाटा मोटर्स कंपनीला बेकायदा बांधकामाबाबत २५९ कोटी रुपयांची नोटीस बजावण्यात आली. या कंपनीतील कामगार युनियनच्या अध्यक्षपदी आमदार लांडगे यांचे बंधू कामगार नेते सचिन लांडगे कार्यरत आहेत. या कारवाईविरोधात लांडगे समर्थक नगरसेवकांनी महापालिका सभागृहात आवाज उठवला. कारण, ‘टेल्को’ हा पिंपरी-चिंचवडच्या अस्मितेचा विषय आहे. टेल्कोवर कारवाई झाली असती, तर स्थानिक लोकप्रतिनिधी आणि महापालिका प्रशासनाबाबत उद्योगविश्वामध्ये चुकीचा संदेश गेला. त्यानंतर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि समरसता पुनरुथ्थान गुरूकुलमचे संस्थापक गिरीश प्रभुणे यांना केंद्र सरकारकडून पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला. प्रभुणे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपाशी नाळ जुळलेले आहेत. त्यामुळे भाजपाला पर्यायायाने स्थानिक नेते दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांना फायदा होत होता. त्यामुळे अनधिकृत बांधकाम आणि मिळकतकर थकबाकीच्या कारणाने नोटीस काढून पद्मश्री प्रभुणे आणि संघ परिवारास बदनाम करण्यात आले.

विशेष म्हणजे, टेल्को आणि पद्मश्री प्रभुणे यांच्यावर कारवाई आणि नोटीसांची लक्षवेधी ‘मीडिया ट्रायल’ करण्यात आली. एखाद्या राजकीय नेत्याप्रमाणे ‘पीआर’ अन् पब्लिसिटी करण्यात आली. राज्यभरात टेल्को आणि पद्मश्री प्रभुणेंची बातमी गाजवली. यावर भाजपाच्या स्थानिक नेत्यांनी स्मिता झगडे यांच्या कार्यपद्धतीला कडाडून विरोध केला.

### स्वाभिमानाबाबत ‘नो कॉम्प्रमाईझ’



**» जांभळे-पाटील विरुद्ध झगडे असा वाद ‘मॅट’मध्ये सुरू होता. पहिल्या सुनावणीत झगडे यांना दिलासा मिळाला. दुसऱ्या सुनावणीत जांभळे-पाटील सरस ठरले. या दोन सुनावणीच्या मधल्या काळात झगडे यांचा महापालिकेतील कार्यकाळ संपला. तसेच, आयुक्त शेखर सिंह यांनी झगडे यांना शासन सेवेत परत घ्यावे, असा अहवाल राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठवला. दरम्यान, रजेचा अर्ज मंजूर केलेला नसतात झगडे यांनी परदेशवारी केली. या सर्व बाबींवर ‘मॅट’मध्ये चर्चा झाली. शासन सेवेत परत पाठवण्याबाबत ‘मॅट’ने आयुक्त शेखर सिंह यांच्याबाजुने सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे झगडे यांची अन्य ठिकाणी बदली करण्याबाबत निर्णय झाला. त्यानुसार झगडे यांची बदली आता सातारा जिल्ह्यात झाली आहे. या सर्व प्रकारात आमदार महेश लांडगे यांच्याकडे राज्यातील बड्या नेत्यांनी झगडे यांच्याबाबत समझोत्याची भूमिका घ्यावी याकरिता शिफारस केली. तसेच, काही बड्या अधिकाऱ्यांनीही झगडे यांना पिंपरी-चिंचवडमध्ये रुजू करुन घ्यावे, अशी विनंती केली. मात्र, पिंपरी-चिंचवडकरांचा स्वाभिमान दुखावला आहे. त्यामुळे झगडे यांच्या कार्यपद्धतीशी ‘कॉम्प्रमाईझ’ करणार नाही, अशी कठोर भूमिका आमदार लांडगे यांनी घेतली, असे वरिष्ठ अधिकारी सांगतात.**

### ‘मॅट’ मधील लढा अन् उच्च न्यायालयाचा निर्णय...



» २०२२ मध्ये महाविकास आघाडीची सत्ता गेली. त्यानंतर राजकीय व प्रशासकीय कनेक्शन वापरून स्मिता झगडे यांनी तत्कालीन अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांच्या जागी पदोन्नती मिळवण्यासाठी ‘फिल्डिंग’ लावली होती. कारण, झगडे यांची महापालिकेतील कार्यकाळाची मुदत संपलेली होती. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले. अतिरिक्त आयुक्तपदासाठी त्यांची ‘ऑर्डर’ही झाली. मात्र, पिंपरी-चिंचवड शहर आणि शहरातील राजकीय नेते बदनाम करण्यासाठी कारस्थान करण्याचा ठपका झगडे यांच्या कारकीर्दीवर लागला होता. त्यामुळे हा मुद्दा प्रतिष्ठेचा करीत झगडे यांच्या पदोन्नतीची झालेली ‘ऑर्डर’ थांबवण्यासाठी महापालिका आयुक्त, मंत्रालय स्तरावर दबाव निर्माण झाला. तोपर्यंत प्रदीप जांभळे-पाटील यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती झाली. त्यामुळे झगडे यांनी हा विषय ‘इगो’चा केला. त्यांनी ‘मॅट’मध्ये धाव घेतली. ‘मॅट’चा पहिला निकाल झगडे यांच्या बाजुने लागला. जांभळे-पाटलांची नियुक्ती अयोग्य असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप झाल्याचेही निरीक्षण मॅटने नोंदवले. याविरोधात जांभळे-पाटील यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने आदेश दिला की, ‘मॅट’ ने पुन : सुनावणी घ्यावी. त्यात राजकीय हस्तक्षेप दोन्ही बाजुने झाल्याचे निदर्शनास आले. ‘मॅट’ ने जांभळे-पाटील यांनी नियुक्ती योग्य असल्याचे स्पष्ट केले.

*» तात्पर्य... असे की पिंपरी-चिंचवड शहराचे राजकारण आणि प्रशासकीय यंत्रणा आजही स्थानिक अस्मिता, स्वाभिमान... या मुद्यावर चालते. तत्कालीन कर्तव्यदक्ष आयुक्त श्रीकर परदेशी यांनी शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करुन गोरगरिब नागरिकांच्या घरांवर बुलडोझर फिरवला. अत्यंत प्रभावशाली असलेल्या या अधिकाऱ्याला त्यावेळी स्थानिक नेत्यांनी विरोध केला. किंबहुना, परदेशी यांची मुदतपूर्व बदली झाली. तत्कालीन पोलीस आयुक्त कृष्णप्रकाश, महापालिका आयुक्त राजेश पाटील, अतिरिक्त जितेंद्र वाघ, विकास ढाकणे यांचीसुद्धा मुदतपूर्व बदली झाली. त्यानंतर स्मिता झगडे यांच्याबाबतीत तेच झाले. त्यामुळे हा केवळ राजकीय विषय मुळीच नव्हता. ज्या अधिकाऱ्यांनी सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकर, स्थानिक नेते, शहराच्या अस्मितेला हात घातला. त्यांना पिंपरी-चिंचवडकरांनी कडाडून विरोध केला, असा इतिहास आहे. परिणामी, राज्य सरकारकडून नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांनी यापुढील काळात पिंपरी-चिंचवडकरांशी जुळवून घेवून काम करावे. “शहर कोणाच्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न केला, तर तुम्हाला जागा दाखवली जाईल” असाच संदेश यानिमित्ताने प्रशासकीय यंत्रणेत रुजला आहे.*




# भटक्यांच्या पालावर कधी पोहोचणार लोकशाही?

**जवळपास २० कोटी लोकसंख्या असणारा भटका-विमुक्त समाज आजही भारतीय समाजातील एक अदृश्य घटक आहे. हा समाज आपल्या देशात वावरतो, देशाच्या विकासात आपली भूमिका बजावतोय याची जाणीव तरी आपल्याला आहे का?**

कित्येक शतकांपासून भटकंती करत आपलं पोट भरणाऱ्या या समाजाला आपण भटक्या जमाती म्हणतो. ३१ ऑगस्ट १९५२ ला गुन्हेगारी जमाती कायदा रद्द झाला आणि अशा २०० जमाती या कायद्यातून मुक्त झाल्या. तोच दिवस विमुक्त दिवस म्हणून ओळखला जातो. तेव्हा आश्वासन देण्यात आलं होतं की या कायद्यात सूचिबद्ध २०० पेक्षा जास्त जमातींवर जन्मजात गुन्हेगारीचा लादलेला शिक्का पुसला जाईल, परंतु प्रत्यक्षात ते झालेलं दिसत नाही. विकासाच्या प्रवाहात क्वचितच हा समाज बघायला मिळतो. आजही हा समाज अन्न, वस्त्र, निवाऱ्यासाठी वणवण भटकतोय. आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजा तर त्याच्यापासून कोसो दूरच आहेत. गुन्हेगारी जमाती कायदा रद्द झाला त्यापाठोपाठ वेगवेगळ्या राज्यांनी हॅबिच्युअल ऑफेंडर्स (HABITUAL OFFENDERS) नावाने कायदे बनवायला सुरुवात केली. हे कायदे गुन्हेगारी जमाती कायद्यासारखेच होते. फक्त त्यातून जमाती हा शब्द वगळण्यात आला



होता. अजूनही बहुतेक राज्यांमध्ये हे कायदे लागू आहेत. कोणतीही व्यक्ती दोषी ठरत नाही तोवर तिला निर्दोष समजणं, हा कुठल्याही फौजदारी न्यायशास्त्राचा गाभा आहे, पण हे कायदे या तत्त्वाच्या परस्परविरोधी आहेत. जून महिन्यात वारीच्या काळात आळंदी पोलिसांनी चोरी करू शकतील या संशयावरून १५० पारधी लोकांना पकडून दोन दिवस बंदिस्त ठेवले होते, त्यात लहान मुलं, गरोदर महिला यांचा समावेश होता. हे अनुच्छेद १४ आणि २१ मधील मूलभूत हक्कांचं उल्लंघन होतं. अमेरिकेतले सेंट्रल पार्क फाइव्ह हे प्रकरण प्रसिद्ध आहे. १९८९ मध्ये बलात्काराच्या एका प्रकरणात पोलिसांना गुन्हेगाराचा शोध लागत नव्हता, तेव्हा त्यांनी सहा कृष्णवर्णीय अल्पवयीन मुलांना पकडून गुन्हा कबूल करायला भाग पाडलं आणि ते आरोपी असल्याचं जाहीर केलं. फक्त कृष्णवर्णीयांनीच नाही तर अपराधगंडातून काही श्वेतवर्णीयांनीही या संदर्भात वर्णभेदाच्या विरोधात रस्त्यावर उतरून आंदोलनं केली. २००२ मध्ये खरा गुन्हेगार सापडला आणि त्या मुलांना सोडून देण्यात आलं. या घटनेने पूर्ण अमेरिकन न्यायप्रणाली ढवळून निघाली आणि कायद्यांमध्ये मूलभूत सुधारणा व्हायला सुरुवात झाली. जगभर या घटनेचा निषेध झाला. त्यावर संशोधन झालं, चित्रपट बनवले गेले. २००३ मध्ये अशीच एक घटना भारतात घडली. नाशिकमध्ये बलात्कार करून, पाच जणांचा खून करून आणि दरोडा टाकून दरोडेखोर फरार झाले. पोलिसांना खरे गुन्हेगार सापडत नव्हते. मग त्यांनी सहा पारध्यांना पकडलं. त्यापैकी एक जण अल्पवयीन होता. फारसे पुरावे नसतानाही न्यायालयात गुन्हा सिद्ध झाला आणि त्यांना फाशीची शिक्षा झाली. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली तेव्हा त्यांना चुकीच्या पद्धतीने अडकवलं गेलं आहे हे सिद्ध झालं. २०१९ मध्ये त्यांना निर्दोष मुक्त करण्यात आलं. शोकांतिका अशी की हे प्रकरण चर्चेत तर आलंच नाही, माध्यमांमध्येही त्याला जेमतेम जागा मिळाली. संबंधित पोलिसांवर कोणतीच कारवाई झाली नाही. या लोकांना चुकीच्या पद्धतीने तर फसवण्यात आलं नाही ना, हा प्रश्नही न्यायव्यवस्थेला पडला नाही. एकीकडे अशाच प्रकरणामुळे पूर्ण अमेरिका पेटून उठते, तर दुसरीकडे भारतात तसंच प्रकरण घडून कुणाच्या लक्षातही येत नाही. स्वत:ला तारणहार समजणारा इथला उच्चवर्णीय समाज अशा मूलभूत गोष्टींसाठी सोयीस्करपणे आंधळा आहे. हे मूलभूत प्रश्न जिवंत ठेवण्यासाठी हजारो वर्षांपासून इथली विषमतावादी व्यवस्था पूरक ठरली आहे. निर्णयप्रक्रियेच्या कुठल्याच क्षेत्रात भटक्या-विमुक्त समाजाचं नेतृत्व अजिबात दिसत नाही. याचं कारण या समाजाबद्दलचे पूर्वग्रह. बंजाऱ्याने चोरी केली, पारध्याने घर फोडलं, वडाराने पाकीट मारलं अशा बातम्या बघायला मिळतात. दुसरीकडे विजय मल्ल्याची जात मात्र कुठल्याच बातमीत दिसत नाही. या समाजाचा मानवंशशास्त्र, आर्थिक आणि सामाजिक शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास व्हायला पाहि.

## संपादकीय »

### तंत्रज्ञान क्रांती


***आधुनिक माहिती तंत्रज्ञानाने साहित्य निर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. संगणक, इंटरनेट आणि इतर तंत्रज्ञानाने लेखकांना नवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.***

या तंत्राला शत्रू न मानता मित्र माना. अनेकविध पर्याय उपलब्ध होतील. पूर्वी लेखक हस्तलिखित वापरत होते. त्यात काही चुका आढळल्या तर सर्व मजकूर पुन्हा लिहावा लागत असे. 2000 नंतर डेस्क टॉप पब्लिशिंग (संगणकीय डेटा एंट्री) मुळे या प्रक्रियेत क्रांती झाली आणि सर्व घटकांना फायदा झाला (लेखक, प्रकाशक, टंकलेखक). आता यापुढील पायरी 2025 नंतर येईल. चॅट बॉट्सशी संवाद साधून आपण मजकूर त्वरित संगणकीय फॉरमॅटमध्ये आपोआप तयार करू शकाल. ना हाताने लिहिणे, ना संगणकावर टाईप करणे. इंटरनेटमुळे (विशेषतः सोशल मीडिया) लेखकांना त्यांच्या साहित्य निर्मितीचा प्रचार आणि प्रसार करणे सोपे झाले आहे. लेखक आता त्यांच्या साहित्य निर्मितीला जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचवू शकतात. इतर तंत्रज्ञानांनीही साहित्य निर्मितीच्या क्षेत्रात मोठा बदल घडवून आणला आहे.

**आपण विष्णूची सहस्त्रनामे पवित्र मानतो, गणपतीची १०८ नावं नियमित म्हटली जातात. एवढंच काय तर, अल्लाचीही ९९ नावं असल्याचे संदर्भ आहेत. तसंच, आपण देशाला मातृभूमी म्हणून, देवाएवढंच महत्व देतो. मग आपल्या देशाला एकाच नावानं ओळखलं जावं, हा आग्रह कशासाठी? इंडिया, भारत ही दोन नावं तर घटनेनं स्वीकारलेली आहेत. त्यामुळे एकाच नावाचा आग्रह विविधतेच्या गाभ्याला धक्का पोहचवणारा आहे.**

# फक्त 'भारत' असंच बोलायला हवं

जी-२० परिषदेसंदर्भातील राष्ट्रपतीच्या एका आमंत्रणपत्रिकेवर नेहमीप्रमाणे 'प्रेसिडेंट ऑफ इंडिया' लिहिण्याऐवजी 'प्रेसिडेंट ऑफ भारत' असे लिहिलं म्हणून देशभर प्रचंड गदारोळ माजला. त्याचप्रमाणे पंतप्रधानांनी आपल्या इंडोनेशियाच्या दौऱ्यासंदर्भातील अधिकृत नोंदीवरही 'प्राइम मिनिस्टर ऑफ भारत' असा उल्लेख केलाय. या सगळ्यामुळे देशाचं नाव आता फक्त भारत असंच होणार, अशी जोरदार चर्चा सुरू झाली. ऐतिहासिक, सामजिक, राजकीय अशा सर्वच बाजूंनी या विषयावर प्रतिक्रिया येऊ लागल्या. उजव्या विचारसरणीच्या अनेकांनी असंच व्हायला हवं, अशी बाजू लावून धरली.



तर तिला विरोध करणाऱ्यांनी, सरकार विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीला घाबरलं, अशी भूमिका घेतली. पण यात खरा मुद्दा फक्त नावाचा नसून, एकाच नावाच्या आग्रहाचा आहे. जिथं देवाला, माणसांना अनेक नावं असू शकतात, तर जमिनीच्या तुकड्याला का नाही. राष्ट्रपती आणि पंतप्रधानाच्या प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांमुळे या चर्चेला तोंड फुटलं. पण, या सगळ्याची सुरुवात होते ती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या भाषणाने. १ सप्टेंबर २०२२ रोजी गुवाहटीत जैन समाजाच्या एका कार्यक्रमात बोलताना मोहन भागवत म्हणाले की, शतकानुशतके आपल्या देशाचं नाव भारत आहे. सर्व व्यावहारिक ठिकाणी त्याचा उल्लेख भारत असा व्हायला हवा. त्यानंतर लगेच काही दिवसांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी आपल्या पत्रावर भारत असा उल्लेख केल्याचं उघड झालं. या दोन्ही पत्रांचे फोटो समाजमाध्यमांवर प्रकाशित करत भाजपच्या नेत्यांनी त्याचं कौतुक केलं. तर विरोधकांनी, त्यावर टीका करायला सुरुवात केली. आता यामुळे अनेक मुद्दे चर्चेला आले. त्यात काही अभ्यासकांनी भारताचा इतिहास काढला. तर काहींनी मिम्स बनवून या मुद्द्यावर खिल्ली उडविली. खरं, तर देशात जी-२० सारखी महत्त्वाची परिषद होत असताना, या विषयाची गरज होती का? असल्यास कोणाला होती? का होती? असे प्रश्न उपस्थित होतात.

पण देशात महागाई, बेरोजगारी, मणिपूर, अदानींच्या आर्थिक व्यवहारांवर उचललेले जाणारे आक्षेप असे अनेक मुद्दे असताना, देशातील माध्यमांमधे चर्चेचा मुख्य मुद्दा इंडिया की भारत हा होणं, ही सरळसाधी गोष्ट नाही. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र होण्यापूर्वीपासूनच २६ जानेवारी १९५० पर्यंत अनेकदा आपल्या देशाचं नाव काय असावं, यावर चर्चा झाली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# उमरग्यात मराठा आंदोलक आक्रमक!

## » मराठा आरक्षण: तरुणाची तलावात उडी घेऊन आत्महत्या

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीसाठी धाराशिव जिल्ह्यातील माडज (ता. उमरगा) येथील किसन माने (३०) या तरुणाने बुधवारी सायंकाळी गावातील शिवकालीन वैजनाथ महाराज तलावात उडी घेऊन आत्महत्या केली. दरम्यान, या घटनेची वार्ता वाऱ्यासारखी पसरल्यानंतर माडज गावासह तालुक्यातील अन्य गावांतील लोकांचा जमाव वाढल्याने तणाव निर्माण झाला.**



सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. या घटनेनंतर मराठा तरुणांनी उमरगा बंदची हाक दिली आहे. तसेच आत्महत्या करणाऱ्या तरुणाचा मृतदेह तहसील कार्यालयासमोर ठेवण्यात आला. जो पर्यंत आरक्षण मिळत नाही, तो पर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका आंदोलकांनी घेतली होती. तहसील परिसरात मराठा समाजाचे आंदोलक मोठ्या संख्येने जमा झाले होते. त्यामुळे काही वेळ तणाव निर्माण झाला होता. यावेळी आंदोलकांनी एक कार पेटवून दिली. त्यामुळे पोलिस प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली. या आंदोलकांना चर्चेअंती शांत करण्यात आले. त्यानंतर मृतदेह घेऊन ते तरुणाची गावी माडजला अंत्यसंस्कारासाठी रवाना झाले. दरम्यान अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### बलिदानास शासन जबाबदार - सुळे

» या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. त्या म्हणाल्या की, 'माडज, जि. धाराशिव येथे मराठा आरक्षणाची मागणी करणाऱ्या किसन चंद्रकांत माने या तरुणाने आत्महत्या केल्याची घटना घडली. ही अतिशय दुःखद आणि दुर्दैवी घटना आहे. हे सरकार अंतरवली येथील मराठा आंदोलकांवरील लाठिहल्ल्यानंतर तरुण वर्गात तसेच मराठा समाजात उसळलेल्या असंतोषाला योग्य पद्धतीने हाताळण्यात सपशेल अपयशी ठरले आहे. या तरुणाच्या बलिदानास केवळ हे शासन जबाबदार आहे. किसन माने यांना भावपूर्ण श्रद्धांजली.'

### आंदोलकांनी एक कार दिली पेटवून

» आरक्षण देण्याच्या मागणीसाठी किसन माने (३०) या तरुणाने शिवकालीन वैजनाथ महाराज तलावात उडी घेऊन आत्महत्या केली. तहसील परिसरात मराठा समाजाचे आंदोलक मोठ्या संख्येने जमा झाले होते. त्यामुळे काही वेळ तणाव निर्माण झाला होता. यावेळी आंदोलकांनी एक कार पेटवून दिली. त्यामुळे पोलिस प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली. या आंदोलकांना चर्चेअंती शांत करण्यात आले. त्यानंतर मृतदेह घेऊन ते तरुणाची गावी माडजला अंत्यसंस्कारासाठी रवाना झाले. दरम्यान अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# जरांगे पाटील फकीर माणूस!

## » खासदार संजय राऊतांचा हल्लाबोल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालन्यात उपोषणाला बसणाऱ्या मनोज जरांगे यांची समजूत काढण्यासाठी शिंदे-फडणवीस सरकारकडून जोरदार प्रयत्न केले जात आहेत. मंत्री गिरीश महाजन यांनी मनोज जरांगेंची भेट घेत त्यांना आश्वासन दिलं. या भेटीनंतर महाजनांनी जरांगे पाटलांनी १ महिन्याचा वेळ दिल्याचं विधान केलं.**



### नेत्यांनी गंडवागंडवी इथे करू नये

» "मनोज जरांगे पाटील अत्यंत फकीर माणूस आहे. मी जेव्हा त्यांना भेटलो तेव्हा मलाही आश्चर्य वाटलं. एवढ्या साध्या माणसाने मराठा समाजाच्या प्रश्नावर महाराष्ट्र सरकारला जेरीस आणलं. त्यामुळे भाजपा नेत्यांनी त्यांची गंडवागंडवी इथे करू नये. खरं बोला, सत्य बोला आणि समाजाला न्याय द्या," असं मत संजय राऊतांनी व्यक्त केलं.

### दहावा दिवस

» मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करत असलेल्या मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आजचा दहावा दिवस आहे. त्यामुळे उपोषणाचा परिणाम आता त्यांच्या प्रकृतीवर पण होताना पाहायला मिळत आहे. काही वेळापूर्वी आरोग्य विभागचे एक पथक उपोषणास्थळी दाखल झाले आहेत. दरम्यान मनोज जरांगे यांची बीपी कमी झाली असून, त्यांच्या किडनीवर परिणाम होत असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले आहेत.

दुसरीकडे मनोज जरांगेंनी सरकारला चार दिवसांचा वेळ दिल्याचं म्हटलं. यावर शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाष्य केलं. तसेच गिरीश महाजन यांनी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांचं उपोषण गुंडाळलं होतं, असा आरोप केला. ते गुरुवारी (७ सप्टेंबर) मुंबईत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलत होते.

संजय राऊत म्हणाले, "मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी त्यांचा प्राण पणाला लावला आहे. कधीकाळी भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर अण्णा हजारे यांनी दिल्ली आणि महाराष्ट्रात उपोषण केलं होतं. तेव्हाही हेच गिरीश महाजन मध्यस्थी करायला होते.

त्यातून काहीही निष्पन्न झालं नाही. भ्रष्टाचार जोरात आहे. गिरीश महाजन फक्त अण्णांना गुंडाळून आले. मात्र, मनोज जरांगे पाटील ही व्यक्ती गुंडाळली जाणारी नाही.

# आरपारची लढाई लढण्याचाही निर्धार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

मराठा आरक्षणासाठी जालन्याच्या आंतरवाली सराटीत सुरू असणाऱ्या आंदोलनावर अद्याप तोडगा निघाला नाही. सरकारने या प्रकरणी कुणबी दस्तऐवज दाखवणाऱ्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला. तसा GR ही काढला. पण त्यात वंशावळ दाखवण्याची अट ठेवली. त्यावर मराठा आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी हरकत घेऊन सरकारचे टेन्शन वाढवले. सरकार व आंदोलकांत खालील 3 मुद्द्यांवर घोडे अडले आहे. जरांगे पाटील यांनी गुरुवारी आपल्या 3 प्रमुख मागण्या पत्रकार परिषदेत मांडल्या. ते म्हणाले की, सरकारने काल काढलेल्या GR मधून वंशावळी हा शब्द वगळवा. त्याजागी सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या असा उल्लेख करावा. सरकारने आमच्या 70 टक्के मागण्या मान्य केल्या. आम्ही त्याचे स्वागत करतो. पण त्यांनी वंशावळी शब्द टाकून मोठी चूक केली. आमच्याकडे कोणतेही कागदपत्र नाहीत. ते असते तर आम्ही स्वतः जाऊन प्रमाणपत्र घेतले असते. त्यासाठी सरकारच्या GR ची गरजच नव्हती, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. सरकारने मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची घोषणा केली होती. हे गुन्हे मागे घेण्याचे सरकारच्याच हातात आहे. त्यासाठी अहवाल तयार करण्याची गरज नाही. एखादी समिती स्थापन करण्याचीही गरज नाही. आज ना उद्या ते निर्णय घेतीलच. पण ते गुन्हे मागे का घेत नाही हे कळत नाही. हा मुद्दा मागे पडणार नाही. द्वेषापोटी आमच्यावर टाकलेले गुन्हे मागे घ्या, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. मराठा समाजावर लाठीमार करणाऱ्या अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. आम्हाला ते मंजूर नाही. या अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई झाली पाहिजे. या प्रकरणी सरकारने तत्काल पाऊले उचलावीत.

# इंडिया-भारत वादावर बोलू नका!

## सनातन धर्म वादावर बोलण्याची सूट : पंतप्रधान नरेंद्र मोदी

। नवी दिल्ली ।


**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक घेतली. यावेळी त्यांनी मंत्र्यांना इंडिया विरुद्ध भारत वादावर बोलू नये असे सांगितले. तसेच, G20 शिखर परिषदेत अधिकृत व्यक्तीशिवाय कोणत्याही मंत्र्याने कोणतेही विधान करू नये. पंतप्रधान मोदींनी काही अटींसह सनातन धर्म वादावर बोलण्याची मंत्र्यांना परवानगी दिली आहे. 2 सप्टेंबर रोजी तामिळनाडूचे**

मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांचे पुत्र उदयनिधी स्टॅलिन यांनी सनातन धर्म संपवण्याबाबत बोलले होते. चार दिवस उलटूनही ते आपल्या वक्तव्यावर ठाम आहेत.

उदयनिधी बुधवारी चेन्नईत म्हणाले- ते हिंदू धर्माच्या विरोधात नाहीत, तर जातिभेदासारख्या प्रथांविरोधात आहेत. स्टॅलिन यांच्या वक्तव्यावर दिल्ली आणि यूपीमध्ये एफआयआर दाखल करण्यात आला आहे. कर्नाटकातील भाजप नेते नागराज नायक यांनीही त्यांच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. पंतप्रधान मोदींनी मंत्र्यांना G20 इंडिया मोबाईल ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. पंतप्रधान म्हणाले की ॲपमुळे मंत्र्यांना परदेशी पाहुण्यांशी संवाद साधणे सोपे होईल. हे ॲप परराष्ट्र मंत्रालयाने लॉन्च केले आहे. यामध्ये समिटमधील सर्व घडामोडींची माहिती देण्यात आली आहे. मंगळवारपर्यंत हे ॲप १५ हजारांहून अधिक वेळा डाऊनलोड झाले आहे. या ॲपद्वारे सर्व G20 देशांच्या भाषांमध्ये परदेशी पाहुण्यांशी संवाद साधता येईल. यामध्ये एकूण 24 भाषा दिल्या आहेत. पंतप्रधान मोदींनी मंत्र्यांनाही G20 परिषदेला उपस्थित राहण्याच्या सूचना केल्या. 9 सप्टेंबर रोजी रात्रीच्या जेवणाला उपस्थित राहणाऱ्या खासदारांना प्रथम त्यांच्या वाहनाने संसद भवन संकुलात पोहोचावे लागेल. येथून ते बसमध्ये बसून कार्यक्रमस्थळी जातील. राज्यांचे मुख्यमंत्रीही अशाच पद्धतीने कार्यक्रमस्थळी पोहोचतील. मंत्री आणि मुख्यमंत्री संध्याकाळी 5.50 वाजता संसद भवन संकुलात पोहोचतील आणि संध्याकाळी 6.30 पर्यंत कार्यक्रमस्थळी पोहोचतील. परराष्ट्र सचिव विनय मोहन क्वात्रा यांनीही मंत्र्यांना परिषदेतील प्रोटोकॉल आणि इतर बाबींची माहिती दिली. G20 शिखर परिषद भारत मंडपम कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार आहे.

आर्किटेक्ट संजय सिंह यांच्याशी चर्चा केली. प्रत्येक राज्यातील कलाकृती त्याच्या सजावटीत वापरल्या जातात. सर्वात खास गोष्ट म्हणजे समिट हॉलसाठी झेक प्रजासत्ताकातून आयात केलेले झुंबर. या सभागृहात 29 देशांच्या राष्ट्रप्रमुखांची बैठक होणार आहे.



### G20 इंडिया ॲप डाउनलोड करा

» पंतप्रधान मोदींनी मंत्र्यांना G20 इंडिया मोबाईल ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. पंतप्रधान म्हणाले की ॲपमुळे मंत्र्यांना परदेशी पाहुण्यांशी संवाद साधणे सोपे होईल. हे ॲप परराष्ट्र मंत्रालयाने लॉन्च केले आहे. यामध्ये समिटमधील सर्व घडामोडींची माहिती देण्यात आली आहे. मंगळवारपर्यंत हे ॲप १५ हजारांहून अधिक वेळा डाऊनलोड झाले आहे. या ॲपद्वारे सर्व G20 देशांच्या भाषांमध्ये परदेशी पाहुण्यांशी संवाद साधता येईल. यामध्ये एकूण 24 भाषा दिल्या आहेत.

# अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन आज भारतात येणार!

## सोबत 60 वाहनांचा ताफा; मोदींसोबत द्विपक्षीय बैठकही घेणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन उद्या म्हणजेच 8 सप्टेंबर रोजी 3 दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. राष्ट्रपती झाल्यानंतर त्यांचा हा पहिलाच भारत दौरा असेल. संध्याकाळी ते एअरफोर्स-1 ने दिल्लीला पोहोचतील. पंतप्रधान मोदीही त्यांचे स्वागत करू शकतात. 8 सप्टेंबर रोजी बायडेन पंतप्रधान मोदींसोबत द्विपक्षीय बैठकही घेणार आहेत. यापूर्वी व्हाईट हाऊसने सांगितले होते की ते 7 सप्टेंबरपासून दिल्लीच्या दौऱ्यावर असतील.**

आता व्हाईट हाऊसने एक प्रसिद्धीपत्रक जारी करून ते अमेरिकेतून जर्मनीतील रामस्टीन शहरात जाणार असल्याचे म्हटले आहे. तेथून भारतात येईल. यानंतर ते 9-10 सप्टेंबर रोजी होणाऱ्या G-20 शिखर परिषदेत सहभागी होतील. बायडेन यांना दिल्लीच्या ITC मौर्य हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. बायडेन यांच्या सुरक्षेसाठी अमेरिकेची सीक्रेट सर्व्हिस टीम 3 दिवसांपूर्वी भारतात पोहोचली आहे. बायडेन हे सीक्रेट सर्व्हिसच्या 300 कमांडोच्या सुरक्षेखाली असतील. दिल्लीच्या रस्त्यांवर येणारा सर्वात मोठा काफिलाही त्यांचाच असेल, ज्यात 55-60 वाहने असतील. त्याचवेळी, मीडिया रिपोर्ट्सनुसार, बायडेन यांच्यासाठी जगातील सर्वात सुरक्षित कार 'द बीस्ट' देखील भारतात आणली जात आहे. या कारमध्ये बसून ते G-20 शिखर परिषदेला जाणार आहेत. प्रकरण 1962 मध्ये झालेल्या भारत-चीन युद्धाचे आहे.

20 ऑक्टोबरला चीनने लडाख आणि मॅकमोहन लाइनवर एकाच वेळी हल्ला केला. हा अचानक झालेला हल्ला भारतासाठी गंभीर ठरला आणि आपल्या सैन्याची पूर्ण ताकद असूनही चिनी सैन्याचा जोर वाढला. दरम्यान, 28 ऑक्टोबर रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ केनेडी यांनी पंतप्रधान नेहरूंना पत्र लिहिले होते. लेखक आणि यूएस सुरक्षा प्रकरणांचे तज्ज्ञ ब्रूस रिडल यांनी त्यांच्या JFK'S FORGOTTEN CRISIS या पुस्तकात म्हटले आहे की, केनेडींचे पत्र मिळाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी नेहरूंनी अमेरिकेच्या राजदूताला भेटीसाठी बोलावले. अमेरिकेच्या राजदूताने दिल्लीत उपस्थित ब्रिटीश आणि कॅनडाच्या राजदूतांना याची माहिती दिली. यानंतर अमेरिका आणि ब्रिटनने भारताच्या मदतीसाठी युरोपमधील त्यांच्या लष्करी तळावरून अमेरिकन हवाई दलाची बोईंग 707 विमाने पाठवली. 2 नोव्हेंबरपर्यंत 20,000 किलो वजनाची शस्त्रे आणि दारूगोळा दररोज आठ फ्लाइट्समधून कोलकात्यात पोहोचवला जाऊ लागला. रॉयल एअर फोर्सनेही यात भारताला साथ दिली. यानंतरही जेव्हा चीनने भारताला वेढा घातला आणि ते लेहला पोहोचणार होते, तेव्हा पंतप्रधान नेहरूंनी जेएफकेंना 2 पत्रे लिहिली. यामध्ये त्यांनी अमेरिकेला युद्ध परिस्थितीचे वर्णन करून लढाऊ विमाने, अमेरिकन पायलट आणि बी-47 बॉम्बर विमाने चालविण्यास सांगितले. मीडिया हाउस पॉलिटिकोच्या मते, नेहरूंनी ब्रिटनच्या पंतप्रधानांनाही असेच पत्र लिहिले होते. भारताची मागणी पूर्ण करताना अमेरिकेने युद्धात सामील होण्यास नकार दिला. पण तरीही त्यांनी मदतीचे आश्वासन दिले आणि भारताला शस्त्रास्त्रांचा पुरवठा वाढवला. याशिवाय अमेरिकेने आपल्या सातव्या फ्लीटची जहाजे बंगालच्या उपसागरात पाठवण्याचे आदेश दिले. कोणत्याही परिस्थितीत युद्धात अमेरिका भारतासोबत आहे हे चीनला सांगणे हा त्याचा उद्देश होता. यानंतर 20 नोव्हेंबरला चीनने युद्धबंदीची घोषणा केली. त्याचबरोबर तैवान आणि दक्षिण चीन समुद्रात चीनच्या घुसखोरीच्या प्रयत्नांनाही अमेरिका विरोध करत आहे. अशा परिस्थितीत चीनशी सामना करण्यासाठी दोन्ही देशांना एकमेकांची गरज आहे. याशिवाय दोन्ही देशांनी इंडो-पॅसिफिक क्षेत्रात भागीदारी वाढवून चीनचे वर्चस्व कमी करायचे आहे. अलिकडच्या वर्षांत, चीनने भारतावर वर्चस्व मिळवण्यासाठी केवळ हिंदी महासागरात आपल्या हालचाली वाढवल्या नाहीत तर संपूर्ण दक्षिण चीन समुद्रावर आपला दावाही केला आहे.



### संरक्षण क्षेत्रातील भागीदारी महत्त्वाची

» रशियानंतर अमेरिका हा भारताचा दुसरा सर्वात मोठा संरक्षण भागीदार आहे. भारताच्या शस्त्रास्त्र खरेदीत अमेरिकेचा वाटा सुमारे 14% आहे. भारताचा अमेरिकेसोबतचा संरक्षण व्यापार 21 अब्ज डॉलर म्हणजेच 1.56 लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. रशिया-युक्रेन युद्धानंतर रशियाचे चीनशी असलेले संबंध आणखी घट्ट झाले आहेत. रशिया हा भारताचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र पुरवठादार आहे. 2020 मध्ये भारताने एकूण शस्त्रास्त्रांपैकी सुमारे 50% शस्त्रे रशियाकडून खरेदी केली. मात्र, जागतिक स्तरावर होत असलेले बदल पाहता भारताला संरक्षण क्षेत्रात रशियावरील आपले अवलंबित्व कमी करायचे आहे.

# नागपूर पोलिसही 'जवान'च्या प्रेमात!

बॉलिवूडचा किंग शाहरुख खानचा जवान हा चित्रपट 7 सप्टेंबर रोजी जन्माष्टमीच्या मुहूर्तावर चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. या चित्रपटाने प्रदर्शित होताच सर्वत्र खळबळ उडवली आहे. या चित्रपटाची उत्सूकता प्रेक्षकांना खुप दिवसांपासून होती. त्यानंतर चित्रपटाचा प्रिव्ह्यूनंतर आलेला ट्रेलर पाहिल्यानंतर तर चाहत्यांची उत्सूकता शिगेला पोहचली होती. ॲटली कुमार दिग्दर्शित 'जवान' चित्रपटाची क्रेझ दुबईच्या बुर्ज खलिफावरही पाहायला मिळाली. आता जवानची भुरळ केवळ चाहत्यांनाच नाही तर पोलिसांनाही पडली आहे. आता जवानची भुरळ नागपूर पोलिसांनादेखील पडली आहे. त्याच कारण म्हणजे त्यांनी सोशल मीडियावर केलेल ट्विट. त्याच झालं असं की नागपूर शहर पोलिसांनी त्याच्या ट्विटर हँडलवर शाहरुखच्या जवानचा एक फोटो शेयर केला आहे. या पोस्टरमध्ये त्याचे चित्रपटातील वेगवेगळे लूक दिसत आहेत. यात शाहरुखला ओळखलाही जात नाही. मात्र त्यांनी हा फोटोतून काही चित्रपटाचे प्रमोशन नाही तर नागरिकांना सायबर क्राईमपासून सुरक्षित ठेवण्यासाठी जनजागृती केली आहे. यात त्यांनी शाहरुखच्या वेगवेगळ्या लूकसारखेच अगदी वेगवेगळे पासवर्ड सोशल मीडिया अकाउंट्ससाठी ठेवण्याचे आवाहन केले आहे. 'वेगवेगळ्या सोशल मीडिया अकाउंट्ससाठी वेगवेगळे पासवर्ड सेट करणं असे असते,' असं त्यांनी या पोस्टरमध्ये लिहिलं आहे. तर या पोस्टच्या कॅप्शनमध्ये नागपुर पोलिसांनी लिहिले की, 'जेव्हा तुम्ही अशी पासवर्ड ठेवता, तेव्हा एकही कोणताही फ्रॉडस्टर टिकू शकणार नाही'. सध्या पोलिसांचे हे ट्विट सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अनेकांनी या पोस्टला अनेकांनी कमेंट केल्या आहेत. तर दुसरीकडे शाहरुखचा जवान हा पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर अनेक रेकॉर्ड करणार अशी चर्चा आहे. या चित्रपटाची ॲडवान्स बुकिंगही चांगलीच झाली आहे. त्यामुळे आता हा चित्रपट पहिल्या दिवशी किती कोटींची कमाई करतो हे पहाणे उत्सूकतेचे ठरणार आहे. त्याचबरोबर चित्रपट प्रदर्शित होताच चित्रपटगृहांमध्ये गर्दी वाढली आहे.

# 'सुखी' चा धमाकेदार ट्रेलर



शिल्पा शेट्टीचा आगामी चित्रपट 'सुखी'चा ट्रेलर रिलीज झाला आहे. चित्रपटाची कथा एका गृहिणीच्या जीवनावर आधारित आहे. ती कुटुंबाला न सांगता शाळेच्या गेट टुगेदरसाठी दिल्लीला निघते. हा चित्रपट महिला सबलीकरणावर हलक्या-फुलक्या पद्धतीने भाष्य करतो. सोनल जोशी दिग्दर्शित या चित्रपटात शिल्पाशिवाय अमित साध, कुशा कपिला आणि पावलीन गुलाटी हे कलाकार दिसणार आहेत. 22 सप्टेंबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. ट्रेलरच्या सुरुवातीला गृहिणी बनलेली शिल्पा संपूर्ण घराची जबाबदारी सांभाळताना दिसते. सगळ्यामध्ये त्यांचे शालेय मित्र रियुनियन करण्याची योजना आखतात. शिल्पाचे पती तिला जबाबदारीचे कारण सांगून उपस्थित राहू देत नाही. यानंतर शिल्पा मैत्रिणींना न सांगता भेटण्यासाठी दिल्लीला निघून जाते. इथून ती पूर्णपणे निर्भय, निर्लज्ज आणि निष्काळजी बनते. 2021 मध्ये रिलीज झालेल्या 'हंगामा 2' या चित्रपटाद्वारे शिल्पाने 7 वर्षांनंतर बॉलिवूडमध्ये पुनरागमन केले. यानंतर ती गेल्या वर्षी रिलीज झालेल्या 'निकम्मा'मध्येही दिसली होती. मात्र, हे दोन्ही चित्रपट फारसे चालले नसून आता शिल्पाला 'सुखी'कडून आशा आहेत. सुखी हा चित्रपट 22 सप्टेंबरला थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. या चित्रपटात शिल्पा शेट्टीसोबत कुशा कपिला देखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. कुशानं या चित्रपटात सुखीच्या मैत्रिणीची भूमिका साकारली आहे.

# ठरलं तर मग 'जुईचं' लग्न



मराठमोळी अभिनेत्री जुई गडकरी (JUI GADKARI) सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. एकीकडे जुईची 'ठरलं तर मग' (THARLA TAR MAG) ही मालिका गाजत आहे. टीआरपीच्या शर्यतीतही ही मालिका पहिल्या क्रमांकावर आहे. पण आता या मालिकेतील सायली खऱ्या आयुष्यात लग्नबंधनात अडकणार असल्याच्या चर्चांना सुरुवात झाली आहे. 'ठरलं तर मग' या मालिकेच्या शूटिंगदरम्यान हंच मीडियाला दिलेल्या मुलाखतीदरम्यान अमित भानुशालीला जुईच्या लग्नाबद्दल प्रश्न विचारण्यात आला. जुईच्या लग्नाची तारीख काय असेल असं विचारताच अमित म्हणाला,"24 फेब्रुवारी 2024". अमितने सांगितलेली ही तारीख दुरुस्त करत जुई म्हणाली,"अमित थोडासा चुकलाय कारण लग्नाची तारीख 4 फेब्रुवारी आहे". जुई-अमितचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि अभिनेत्री 4 फेब्रुवारीला लग्नबंधनात अडकणार अशा बातम्या येऊ लागल्याखऱ्या लग्नाबाबत एबीपी माझाशी बोलताना जुई गडकरी म्हणाली,"पुढचं पाऊल', 'वर्तुळ','सरस्वती' आणि 'ठरलं तर मग' या माझ्या चारही मालिकांची लग्न योगायोगाने 4 फेब्रुवारीला वेगवेगळ्या वर्षी शूट झाली आहेत. काही दिवसांपूर्वी 'ठरलं तर मग' मालिकेच्या सेटवर सिनेपत्रकार मंडळी आली होती .

# रश्मिका-विजय लग्नापुर्वीच रहातायत एकत्र!



साऊथचे सुपरस्टार रश्मिका मंदान्ना आणि विजय देवरकोंडा यांची जोडी गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. त्याच्या डेटिंगच्या बातम्याही बऱ्याचदा आल्या आहेत. त्याना अनेकदा एकत्र पाहिलं जात. त्यातच रश्मिकाच्या वाढदिवसाच्या दिवशीही तिचे फोटो व्हायरल झाले होते. त्यांच्या नात्याबद्दलच्या नेहमीच कोणत्या ना कोणत्या बातम्या समोर येत असतात. दोघेही बऱ्याच दिवसांपासून एकमेकांना डेट करत आहेत अशा अफवाही पसरल्या आणि त्याच्या फोटोंनी या अफवांना अधिकच हवा दिली आहे. आता त्यातच दोघांच्या चाहत्यांसाठी आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. खर तर रश्मिका मंदान्नाच्या एका फोटोवरुन ती आणि विजय देवरकोंडा लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये असल्याचा दावा केला जात आहे. सोशल मीडियावर सध्या या चर्चांना उधाण आलं आहे. या चर्चांना सुरुवात झाली ती नुकताच रश्मिकाने तिच्या सोशल मीडिया हँडलवरून शेयर केलेल्या एका फोटोवरुन. तिने स्वतःचा एक फोटो साडीतला फोटो शेअर केला मात्र फोटोत रश्मिकाला नाही तर तिच्या मागचा व्ह्यू पाहिल्यानंतर नेटकऱ्यांना विजयची आठवण झाली. केशरी रंगाच्या साडीत रश्मिका खुपच सुंदर दिसत होती. रश्मिकाने ज्या ठिकाणी फोटो काढला आहे त्याच ठिकाणी विजयने काही दिवसांपुर्वी फोटो काढले होते. विजयने 1 आठवड्यापूर्वी याच ठिकाणी आली होते. रश्मिका आणि विजय यांच्या फोटोमधील जागा सारखीच आहे. म्हणजे दोन्हींच्या मागे दिसणारी टेरेस एकच आहे. त्यामुळे रश्मिका आणि विजय एकत्र राहत असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. त्यामुळे आता चाहते एकीकडे रश्मिकाच्या लूकचं कौतुक करत आहेत. दुसरीकडे, तिच्या आणि विजयच्या लिव्ह-इन रिलेशनशिपच्या चर्चा सोशल मीडियावर व्हायरल झाल्या आहेत. मात्र नेहमीप्रमाणे विजय आणि रश्मिका यांनी याबद्दल काहीही प्रतिक्रिया दिलेली नाही. तरी दोघांचे चाहते त्याच्यासाठी खुप खुश आहेत.

# पाकचा बांगलादेशवर दणदणीत विजय!

## » पाकिस्तानसमोर बांगलादेशची सपशेल शरणागती

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**आज आशिया कप २०२३च्या सुपर-४ फेरीचा पहिला सामना खेळला गेला. हा सामना लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळला संपन्न झाला. आशिया चषकातील पाकिस्तानमधील हा शेवटचा सामना होता. आता पुढील सर्व सामने हे हायब्रीड मॉडेलनुसार श्रीलंकेत होणार आहेत. त्याआधी पाकिस्तानी संघाने बांगलादेशवर ७ विकेट्सने दणदणीत विजय मिळवत सुपर-४मध्ये शानदार सुरुवात केली.**

इमाम उल हक आणि मोहम्मद रिझवान यांनी दमदार अर्धशतके झळकावत संघाला सहज विजय मिळवून दिला. हारिस रौफला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. सुपर-४ मध्ये पोहोचलेल्या चार संघांमध्ये पाकिस्तान आणि बांगलादेश व्यतिरिक्त भारत आणि श्रीलंकेचे संघ आहेत. सुपर फोरमधील दोन संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरतील.

प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १९३ धावा केल्या. कर्णधार शाकिब अल हसन आणि मुशफिकुर रहीम यांच्या व्यतिरिक्त एकही फलंदाज पाकिस्तानी गोलंदाजीसमोर खेळपट्टीवर तक धरू शकला नाही. १९४ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानने चांगली सुरुवात केली. सलामीवीर फखर जमानला सुरुवात मिळाली मात्र तो त्याचे मोठ्या खेळीत रुपांतर करू शकला नाही. त्याने ३१ चेंडूत २० धावा केल्या. त्यात त्याने तीन चौकार मारले. त्याचा साथीदार इमाम उल हकने अप्रतिम अर्धशतक झळकावले पण मोठा फटका मारण्याच्या नादात तो त्रिफळाचीत झाला. त्याने ८४ चेंडूत सर्वाधिक ७८ धावा केल्या. त्यात त्याने पाच चौकार चार षटकारांची आतिषबाजी केली.



पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम या सामन्यात लवकर बाद झाला. त्याने २२ चेंडूत एका चौकारासह १७ धावा केल्या. त्यानंतर आलेल्या विकेटकीपर मोहम्मद रिझवानने इमामला साथ देत ७९ चेंडूत नाबाद ६३ धावा केल्या. त्याच्या या खेळीत त्याने सात चौकार आणि एक षटकार मारला. इमाम बाद झाल्यानंतर आगा सलमान या युवा खेळाडूने अधिक पडझड न होऊ देता २१ चेंडूत १२ धावा केल्या त्यात त्याने एक चौकार मारला. बांगलादेशकडून तस्कीन अहमद, शौर्यफुल इस्लाम आणि मेहदी हसन मिराज या तिघांनाच एक-एक विकेट घेण्यात यश मिळाले. पाकिस्तानने हे लक्ष्य ३९.३ षटकात पूर्ण केले. तत्पूर्वी, बांगलादेशचा डाव १९३ धावांवर आटोपला आहे. बांगलादेशची अखेरची विकेट शरीफुल इस्लामच्या रूपाने पडली.

नसीम शाहने त्याला क्लीन बोल्ड केले. बांगलादेशचा संघ ३८.४ षटकांत केवळ १९३ धावाच करू शकला. मुशफिकर रहीमने सर्वाधिक धावा केल्या. कर्णधार शाकिबने ५३ धावांची खेळी खेळली. मोहम्मद नईमने २० धावांचे योगदान दिले. भारताविरुद्धच्या सामन्यात सर्व १० विकेट्स घेत इतिहास रचणाऱ्या पाकिस्तानी वेगवान गोलंदाजांनी या सामन्यातही नऊ विकेट्स घेतल्या. हारिस रौफने चार आणि नसीम शाहने तीन विकेट्स घेतल्या. शाहीन आफ्रिदी आणि फहीम अश्रफ यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. इफ्तिखार अहमदलाही एक विकेट घेण्यात यश मिळाले.

### आझम या सामन्यात लवकर बाद

» पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम या सामन्यात लवकर बाद झाला. त्याने २२ चेंडूत एका चौकारासह १७ धावा केल्या. त्यानंतर आलेल्या विकेटकीपर मोहम्मद रिझवानने इमामला साथ देत ७९ चेंडूत नाबाद ६३ धावा केल्या. त्याच्या या खेळीत त्याने सात चौकार आणि एक षटकार मारला. इमाम बाद झाल्यानंतर आगा सलमान या युवा खेळाडूने अधिक पडझड न होऊ देता २१ चेंडूत १२ धावा केल्या त्यात त्याने एक चौकार मारला. बांगलादेशकडून तस्कीन अहमद, शौर्यफुल इस्लाम आणि मेहदी हसन मिराज या तिघांनाच एक-एक विकेट घेण्यात यश मिळाले. पाकिस्तानने हे लक्ष्य ३९.३ षटकात पूर्ण केले.

# भारत-पाक सामना धोक्यात?

## » पीसीबीने ने जय शाहांना केलं लक्ष्य

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**आशियाई क्रिकेट परिषद म्हणजेच ACCने आशिया कपचा सुपर-४ टप्पा हंबनटोटा येथे हलवण्याचा निर्णय बदलला आहे. हवामान अंदाजात थोडीशी सुधारणा पाहून एसीसीने स्थळ बदलण्याचा निर्णय बदलला. त्यानंतर पीसीबीने पुन्हा एकदा बीसीसीआयचे सचिव आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष जय शाह यांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे.**

त्याचवेळी माजी पीसीबी प्रमुखांनी सोशल मीडियावर असेही लिहिले की, "भारत पाकिस्तानसोबत सामने खेळण्यास घाबरतो.

नुकतेच कोलंबोतील खराब हवामानामुळे एसीसीने आशिया चषक स्पर्धेतील सुपर-४ सामने येथून हंबनटोटा येथे हलवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र पुन्हा निर्णय बदलत परिषदेने कोलंबो हे ठिकाणच जैसे थे ठेवले आहे. यानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आणि जय शाह पुन्हा आमनेसामने आले आहेत. एसीसीने बोर्डाच्या सर्व सदस्य देशांना पाठवलेल्या आणि नंतर मागे घेतलेल्या गूढ ई-मेलचा पाकिस्तानी प्रसारमाध्यमेही सातत्याने उल्लेख करत आहेत. मेलमध्ये सुपर-४ सामने कोलंबोहून हंबनटोटा येथे हलवण्याचा उल्लेख आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे माजी प्रमुख नजम सेठी यांनी ट्वीटरवर ट्वीट केले की, "बीसीसीआय/एसीसीने पीसीबीला कळवले की त्यांनी पुढील भारत-पाक सामना कोलंबो येथून हंबनटोटा येथे हलवण्याचा निर्णय घेतला आहे. तासाभरातच त्याने आपला विचार बदलला आणि कोलंबो हे ठिकाण जैसे थे राहील त्यात कुठलाही बदल होणार नाही, असे घोषित केले.

हे नक्की काय चालू आहे? भारताला पाकिस्तानविरुद्ध पराभवाची भीती आहे का? यावरून एकच कळते की भारत पाकिस्तानला घाबरतो. पावसाचा अंदाज बघा! या ट्वीटमध्ये सेठी यांनी हंबनटोटा आणि कोलंबोचा हवामान अहवालही अपलोड केला आहे. ज्यामध्ये हंबनटोटामध्ये अनेक दिवस हवामान स्वच्छ आहे आणि कोलंबोमध्ये पावसाची शक्यता आहे.





### सुपर-4 सामने कधी आणि कुठे

» आशिया चषक सुपर-४चे सामने ६ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर दरम्यान होणार आहेत. सुपर-४ची सुरुवात ६ सप्टेंबरला पाकिस्तान आणि ग्रुप बी दुसऱ्या स्थानावर असलेल्या बांगलादेशसोबत होईल. तसेच, ग्रुप बीमध्ये दुसऱ्या स्थानावर असलेल्या भारतासोबत १५ सप्टेंबरला त्यांचा सामना खेळवला जाईल. सुपर-४ मध्ये एकूण ६ सामने खेळवले जाणार आहेत. कोलंबो आणि लाहोरमध्ये सुपर-४ सामने खेळवले जातील.

# राहुलला मिळेल थेट इलेव्हनमध्ये स्थान!

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

विश्वचषक प्रवासाच्या दिशेने पहिले पाऊल टाकत भारतीय संघाने १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. भारतीय संघाला २७ सप्टेंबरपर्यंत संघात बदल करण्याची संधी असली, तरी संघात कोणतेही बदल अपेक्षित नाहीत. संघाची घोषणा होताच संघातील अनेक खेळाडूंची अनुपस्थिती आणि अनेक खेळाडूंच्या निवडीवर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

वनडेत लय शोधण्यात अपयशी ठरलेल्या सूर्यकुमार यादवला सर्वाधिक प्रश्न भेडसावत आहेत. तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादव हे आशिया चषक संघात होते. विश्वचषक संघात या दोन खेळाडूंपैकी फक्त एकाची निवड होऊ शकली. अशा परिस्थितीत कर्णधार रोहित शर्मा आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी सूर्यावर विश्वास व्यक्त दाखवला. मात्र, संघात तिलकला प्राधान्य देता आले असते, असे मत भारताचा माजी यष्टिरक्षक फलंदाज रॉबिन उथप्पाने व्यक्त केले. तो म्हणतो, "तिलक हा बहुआयामी व डावखुरा खेळाडू आहे. विश्वचषक संघात ऑफ-स्पिनरची उणीवही ते पूर्ण करू शकतो.' 'सूर्याकडे चौथ्या स्थानावरून सहाव्या स्थानापर्यंत फलंदाजी व मोठे फटके मारण्याची क्षमता आहे, असे मत भारताचे माजी फलंदाज संजय मांजरेकर यांनी व्यक्त केले.

जर टी-२० सारखी परिस्थिती आल्यास तो सामना बदलू शकतो. देशांतर्गत वनडेत सूर्यकुमार यादवने १२८ लिस्ट ए सामन्यांमध्ये ३३.९८ च्या सरासरीने केवळ ३३६५ धावा केल्या आहेत. विश्वचषक सुरू होण्यापूर्वी भारतासमोर यष्टिरक्षक फलंदाज म्हणून दोन पर्याय आहेत. संघ व्यवस्थापनाला अनेक पर्यायांची डोकेदुखी भेडसावत आहे. ईशान किशनचा अलीकडचा फॉर्म त्याच्यासोबत आहे. तर केएल राहुल मेनंतर स्पर्धात्मक क्रिकेट सामना खेळला नाही.